# महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई

**Miss.Shivani Balaso Dhole**
Student of
Akkatai Ramgonda Patil.Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji.

भारत भूमीला थोर क्रांतिकारक, वीर जवान, समाज प्रबोधक, विचारवंत, समाज सुधारक लाभले आहेत. त्यातीलच एक महत्त्वपूर्ण व्यक्ती म्हणजे पंडिता रमाबाई होय. पंडिता रमाबाई यांनी त्यांचं आयुष्य महिलांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी अर्पण केलं. स्री शिक्षण आणि सामाजिक सुधारणा ही दोन त्यांची मुख्य उद्दिष्ट होती. पंडिता रमाबाई यांनी स्री शिक्षणामध्ये लावलेला हातभार नेहमीच श्रेष्ठ राहील. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना ब्रिटिश राजवट द्वारे पुरस्कार देखील जाहीर करण्यात आला होता. शेवटच्या अगदी श्वासापर्यंत त्यांनी गरजू आणि पिढीत स्त्री यांचा विचार केला. पुढील संशोधनात आपण पंडिता रमाबाई यांच्या संघर्षमय जीवनाची कथा आणि त्यांनी स्त्री शिक्षण आणि समाजसेवेसाठी घेतलेले आतोनात प्रयत्न या लेखाद्वारे बघणार आहोत.

**पूर्वचरित्र**

२३ एप्रिल १८५८1 रोजी पंडिता रमाबाईंचा जन्म गंगामूळ (कर्नाटक) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंत शास्त्री डोंगरे व आईचे नाव लक्ष्मीबाई अनंत शास्त्री यांनी आपली पत्नी बहिण व मुलगी यांना संस्कृत शिकवले म्हणून त्यांना छळ सोसावा लागला गाव सोडल्यानंतर सर्व हिंदुस्थानात तीर्थयात्रा करत १५ - १६ वर्षांनी हे कुटुंब मद्रास इलाख्यात2 आले पण मद्रास प्रांतात भयंकर दुष्काळ पडला होता या दुष्काळात पंडिता रमाबाईंचे आई-वडील व थोरली बहीण मृत्युमुखी पडली . पंडिता रमाबाई व तिचा थोरला भाऊ प्रवास करत करत कोलकत्ता शहरात आले तेथे मात्र त्या दोघांच्याही विद्वतेचे सार्थक झाले कोलकता शहरातील ब्राम्हो समाजाचे पुढील व कोलकत्ता विश्वविद्यालयातील पंडितांनी त्यांची कदर केली त्यांना सन्मानाने विद्यापीठात निमंत्रण दिले त्यांच्या संस्कृत वरील प्रभुत्वामुळे कोलकत्ता येथील सिनेट हॉलमध्ये त्यांच्या पंडिता व सरस्वती या विरुद्धवली बहाल करून गौरव करण्यात आला त्यांनी मराठी ,कन्नड, गुजराती ,बंगाली ,हिंदी , इंग्लिश ,संस्कृत , हिब्रु या सर्व भाषा अवगत होत्या3 . अगाध पांडित्य निर्भयपणा विद्रोहीपणा विवेकवादी सडेतोड पना हे गुण पंडिता रमाबाईंच्या अंगी होते .या पाचशे विद्या पंडिताने रमाबाईंच्या प्रबोधन कार्याची तुलना राजाराम मोहन रॉय यांच्याशी केली आहे धोंडो केशव कर्वे यांच्या मते महाराष्ट्रात विधवा शिक्षणाच्या इमारतीचा पाया घालण्याचे अत्यंत श्रेष्ठ कार्य पंडिता रमाबाई यांनीच केले आहे अशा या पराक्रमी स्त्रिया हिंदुस्थानात काय पण या भूतलावरील वरही मिळायच्या नाहीत.

**विवाह व वैधव्य**

आपल्या बंधूचे मित्र विपिन बिहारीदास मेधावी या बंगाली व्यवसायाने वकील असलेल्या पण शूद्र व्यक्तीशी रमाबाईंचा विवाह नोंदणी पद्धतीने इसवी सन 880 मध्ये झाला पंडिता रमाबाई या चित्पावन ब्राह्मण तर पती दलित एका अर्थाने हा प्रतिरोम विवाह होता दुर्दैवाने तिचे पती विपिन बिहारीदास मेधावी हे लग्नानंतर दीड वर्षांच्या आतच मृत्यू पावले पंडिता रमाबाईला मनोरामा नावाची एक कन्या झाली होती पती निधनानंतर सासरी राहणे शक्यच नव्हते3 या कन्यास घेऊन त्या महाराष्ट्रात परत आल्या पुणे व त्याचा परिसर हीच त्यांची कर्मभूमी ठरली पंडिता रमाबाईंचा पुण्यात येण्याचा हेतू इंग्रजी शिकवण्याचा होता स्वतः त्यांनी इंग्रजीचा अभ्यास खाजगी रीतीने सुरू केला होता पंडिता रमाबाई या उत्तम वक्त्या होत्या4. श्रोत्यांचे म्हण आपल्याकडे आकर्षित करून घेण्याची विलक्षण चातुर्य होते पुण्यात दर आठवड्याला त्यांची व्याख्याने होत असत आपल्या व्याख्यानातून त्या स्त्रियांची निरक्षरता स्त्री दास्य स्त्रियांचे हक्क या विषयांवर बोलत पण व्याख्यानाला पुरुषांना यावयाचे असेल तर त्याने आपली पत्नी मुलगी सून बहीण भाऊजय कोणास तरी सोबत आणावे असे त्या म्हणत या त्यांच्या व्याख्यानामुळे त्यांचा लौकिक वाढत गेला विधवा असूनही स्वतःच्या इच्छेप्रमाणे त्यांनी आपल्या जीवनात वळण दिले होते त्यांनी केशव पण केले नव्हते त्या हातात बांगड्या घालत नसत फक्त पांढऱ्या साड्या वापरत किंवा पोलके वापरत

**पंडिता रमाबाई यांची ग्रंथसंपदा**

माझी साक्ष हे पंडिता रमाबाईंच्या आत्मचरित्राचे नाव

1883 मध्ये इंग्लंडचा प्रवास हा ग्रंथ लिहिला

हाय कास्ट हिंदू वुमन या नावाचे पुस्तक रमाबाईंनी इसवीसन 1888 च्या प्रारंभी प्रसिद्ध केले

ब्राह्मण अबला व पिढीत विधवांच्या अंतकरणाला वाचा फोडणारे व हजारो वर्षे खोल दडवून राहिलेल्या वेदना प्रकट करणारे हे पुस्तक होते

इसवीसन 1889 मध्ये युनायटेड स्टेट ची लोक स्थिती व प्रवास वर्णन हे पुस्तक प्रसिद्ध केले

श्री धर्म नीती हे त्यांचे आणखी एक पुस्तक होय

रमाबाईंनी बायबलचे मराठी भाषांतरही केले आहे

**सामाजिक कार्य**

**१) आर्य महिला समाजाची स्थापना**

आर्य महिला समाज स्थापन्याचे वेध रमाबाई येण्यापूर्वीच पुण्या-मुंबईस लागले होते 30 एप्रिल 882 रोजी पुण्यात आर्य महिला समाज ही संस्था स्थापन केली काशी ताई कानिटकर शेवंताबाई त्र्यंबक व श्रीमंती निकंबे या मराठी भाषिक समाज सुधारक स्त्रिया आर्य महिला समाजाच्या प्रतिनिधी होत्या नीती सन्मार्ग व धर्म यांचा सामान्य बोध व्हावा एकूण स्त्रियांची स्थिती सुधारावी हा आर्य महिला समाज स्थापनेचा हेतू होता

**२) हंटर कमिशन पुढे पंडिता रमाबाईंची साक्ष**

हंटर कमिशन पुढे पंडिता रमाबाईंची साक्ष झाली त्यावेळी त्यांनी खालील मागण्या केल्या होत्या

१) मुलांच्या शाळेतील शिक्षकांपेक्षा मुलींच्या शाळेतील अध्यापिकांना जास्त पगार द्यावा

२) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सक्तीचे करा स्त्रियांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती द्याव्यात

३) स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण घेण्याची व्यवस्था व्हावी

४) स्त्री डॉक्टरांची उणीव आहे ती दूर व्हावी

३) शारदासदन स्थापनेची कल्पना

इसवी सन 1881 च्या शीर गणती नुसार भारतातील विधवा स्त्रियांची आणि बाल विधवांचे प्रमाण जास्त होते हे प्रमाण पाहून पंडिता रमाबाईंचे मन चिंतीत झाले. अशा अनाथ दुर्दैवी स्त्रियांच्या सेवेला वाहून घेण्याचे रमाबाईंनी ठरवले संस्था काढण्याचा विचार बोलून दाखविला पण त्यांना पुढारी व धनिकांकडून प्रतिसाद मिळाला नाही

**४) ख्रिश्चन धर्माचा स्वीकार आणि इंग्लंडला वास्तव्य**

डॉक्टर व्हायचे व माय बहिणींची सेवा करायची असा विचार करून त्या लंडनला गेल्या आपल्या सोबत दोन वर्षाची कन्या घेऊन त्या बोटीने इंग्लंडला 17 मे 1883 रोजी पोहोचल्या तेथे त्यांनी ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतली त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारल्याची बातमी येतात सर्वत्र खळबळ उडाली बाबतीसाच्या वेळी दिलेले मेरी रमा हे नाव आयुष्यात त्यांनी कधीच वापरले नाहीत त्या सरळ रमाबाई डोंगरे मेधावी असे नाव वापरत असत

**५ रमा बाईंचे अमेरिकेतील वास्तव्य (इ.स.1886-1889) :-)**

17 फेब्रुवारी 1886 रोजी पंडिता रमाबाईंनी इंग्लंड सोडले व 6 मार्च 1886 रोजी त्या अमेरिकेत आल्या अकरा मार्चला त्या आनंदाबाई जोशींच्या पदवी दान समारंभास हजर होत्या. इंग्लंड प्रमाणेच अमेरिकत गेल्यावरही तेथील स्त्रीयांनी केलेली प्रगती, स्त्रियांचे शिक्षण, स्त्रियांचा सामाजिक दर्जा हे पाहून त्या आश्चर्यचकित अमेरिकन संस्था, अमेरिकेतील स्त्रिया अमेरिकेतील स्त्रिया, तेथील चर्चा, शिक्षण यादींचा अत्यंत बारकाईने व सर्व बाजूंनी व सर्व बाजूंनी रमाबाईंनी अभ्यास केला त्यासाठी त्यांनी ३०००० मैलांचा प्रवास केला.

**६) रमाबाई असोसिएशन व तिचे कार्य**

अमेरिकेतील स्त्री-पुरुषात रमाबाईंनी हिंदुस्थानच्या बाल विद्वान बद्दल इतकी कमालीची सहानुभूती केली की त्यांच्या कार्याला मदतीसाठी रमाबाई असोसिएशन नावाची संस्था अमेरिकेतील बोस्टन शहरात काढण्यात आली

**७) भारतात आगमन व शारदा सदन या संस्थेच्या कार्यातील योगदान**

इसवी सन १८८९ ला पंडिता रमाबाई अमेरिकेतून कोलकात्याला आल्या मुंबईत त्यांनी 11 मार्च 1889 रोजी विल्सन कॉलेजच्या जवळ शारदा सदन स्थापन केले शारदा सदन सर्वधर्म व जातींना खुले होते त्यानंतर पुढे गुलबर्गा येथे मुलींसाठी एक शाळा रमाबाईंनी काढली होती

**रमाबाईंची इतर कामे**

१) हिंदी राष्ट्रभाषा असावी

२) मद्यपान निषेधक स्त्री मंडळ

३) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पाचव्या अधिवेशनातील सहभाग

४) सामाजिक परिषदेतील सहभाग

५) मध्य प्रदेश व गुजरात दुष्काळग्रस्तांना मदत

६) कडेगाव येथे मुक्ती सदन कृपा सदन व प्रिती सदन ची स्थापना

पंडिता रमाबाईंच्या नीतिमत्तेबद्दल तर त्यांच्या कट्टर शत्रूनेही कधी अक्षर काढले नाहीत लग्नापूर्वी व वैधव्य दशक त्यांच्या चरित्राविषयी कोणी शंका घेतली नाही ख्रिश्चन धर्म स्वीकारला पण त्यांच्या आमचा हिंदू पणा नष्ट झाला नाही त्यांचा

स्वभाव अत्यंत करारी व धडाडीचा होता इंग्लंड अमेरिकेसारख्या थंड देशात त्यांनी मास अंडी खाल्ली नाहीत सर्व आयुष्यात कांदा लसणाचा सुद्धा स्पर्श केला नाही अशा या थोर विदुषीला इसवी सन 1919 स*** त्यांच्या कार्याबद्दल ब्रिटिशांनी सर्वोच्च पुरस्कार हिंदी मे गौरवण्यात आले पुढे 1989 मध्ये त्यांच्यावर टपाल तिकीटही काढण्यात आले भारतासह परदेशातही पंडिता रमाबाई यांनी आपल्या विचारांचा व कार्याचा ठसा उमटवला प्रखर बुद्धिमत्ता अपार कष्ट इत्यादी गुणांसह समाज सुधारणा क्षेत्रात एक उत्तम वस्तू पाठ समाजासमोर ठेवणाऱ्या पंडिता रमाबाई यांचे इसवी सन 1922 मध्ये कडेगाव येथे निधन झाले

**संदर्भ-**

1.informarathi 07.com https://informarathi 07.com
2. maharashtratimes. https://maharashtratimes.com
3. पुरोगामी विचारांच्या थोर समाजसुधारक पंडित रमाबाई / महाराष्ट्रनामा
4. पंडिता रमाबाई राहिल्या का 9/ धर्मांतर केल्यामुळेच दुर्लक्षित
5. Wikipedia https://Mr.m.wikipedia.